# लैंगिक असमानतेमुळे महिलांवरील होणारे अत्याचार: एक अध्ययन

डॉ. रायन महाजन
श्री बिंझाणी नगर महाविद्यालय, नागपूर

डॉ. शरद सांबारे
यशोदा गर्ल्स आर्ट्स & कॉमर्स कॉलेज, नागपूर

---

**सारांश:-**

लैंगिक असमानता ही कोणत्या एका राष्ट्राची समस्या नाही तर ती एक जागतिक स्वरुपाची समस्या म्हणून सर्वांना भेडसावत आहे. समाजामध्ये या समस्येचा सर्वाधिक शिकार जर कोणी झाला असेल तर तो महिला वर्ग आहे. प्राचीन काळापासून तर आजच्या आधुनिक काळामध्ये सुद्धा पुरुषांच्या वर्चस्वाला मान्यता देण्यात आली आहे. आज सर्वच क्षेत्रामध्ये स्त्री ची उपेक्षा करून तिला तिच्या अधिकारापासून वंचित ठेवले जाते. अनेक देशांनी स्त्री संरक्षणासाठी कायदे करून ठेवले असले तरी त्या कायद्यांची फारशी अंमलबजावणी होताना दिसत नाही. महिलांवरील अत्याचारात दिवसेंदिवस वाढ होत असलेली पाहायला मिळत आहे. आपण जेव्हा जगाच्या शाश्वत विकासाची गोष्ट करतो तेव्हा लैंगिक समानता हा महत्वाचा मुद्दा डोळ्यासमोर येतो. संपूर्ण मानव जातीचे प्रतीनिधीत्व करणारी स्त्री जर उपेक्षित, गरीब, बिमार, लाचार आणि मानसिक व शारीरिक त्रासाने त्रस्त असेल तर शाश्वत विकास कसा होईल? महिलांचा उन्नतीसाठी संयुक्त राष्ट्र संघाबरोबर संपूर्ण देश एकत्र दिसत असले तरी त्यांना अजून संपूर्ण समस्या निवारणासाठी उपाय करता आले. प्रस्तूत शोध निबंधात महिलांच्या सामाजिक व इतर पैलूंचा विचार करून महिलांवरील होणाऱ्या अत्याचाराला वाचा फोडून महिलांच्या समस्यांचे अध्ययन करण्यात आले व त्यावर अध्ययनाच्या माध्यमातून काही उपाय सुचविण्याचा प्रयत्न केला आहे.

**अध्ययन समस्या:**

अध्ययन समस्यांची निवड करण्यामागचे मुख्य कारण म्हणजे २१ व्या शतकातील भारतामध्ये, तांत्रिक प्रगती आणि महिलांवरील हिंसा या दोन्ही गोष्टी एकमेकांसोबत चालत आहेत. महिलांवरील ही हिंसा विविध प्रकारची आहे. घर, सार्वजनिक ठिकाण किंवा कार्यालय अशा कोणत्याही ठिकाणी महिला या हिंसेला बळी पडत आहेत. महिलांवरील ही हिंसा आता एक मोठी जागतिक समस्या बनली आहे आणि यापुढे याकडे दुर्लक्ष करता येणार नाही, कारण महिला आपल्या देशाच्या अर्ध्या लोकसंख्येचे प्रतिनिधित्व करतात.

पुरुषप्रधान भारतीय समाजामुळे स्त्रियांना अनेक अत्याचारांना सामोरे जावे लागते. सामान्यतः स्त्रियांना भेडसावणाऱ्या समस्या म्हणजे हुंडाबळी, खून (हत्या), लैंगिक छळ, स्त्रियांना लुटणे, वाटेत अल्पवयीन मुलींची छेडछाड करणे इत्यादी.

भारतामध्ये स्त्रियावरील अत्याचाराला आळा घालण्यासाठी हिंदु वारसा हक्काचा कायदा, दत्तक, घटस्फोट, पोटगी, व्दिभार्या प्रतीबंधक कायदा, हुंडाबंदी कायदा, बालविवाह प्रतीबंधक कायदा इ. कायदे केले असले तरी स्त्रियांना या कायदयाविषयी माहितीचा अभाव आढळतो. १५ ते 20 टक्के स्त्रियांना घटस्फोट व पोटगी कायदयाबाबत साधारण माहीती आहे. रूढी परंपरेचा जबरदस्त पगडा, शिक्षणाची कमतरता, कायदेविषयक माहिती करून घेण्याच्या जागरूकतेचा व औत्सुकतेचा अभाव, आत्मविश्वासाची कमी, आर्थिक बळ, बुरजेपणा आणि मानसिक कमतरतेमुळे कायदे कागदावर राहीले आहेत. त्यामुळे स्त्रीहिंसाचारात आणखी वाढ होत आहे. स्त्रिला समाजात व कुटूंबामध्ये गौण दर्जा देवून तिच्यावर नानाविध अत्याचार केले जाते. स्त्रियांचा कमी होणारा सामाजीक दर्जा तसेच आर्थिक

स्थिती तसेच त्यांच्यावर होणाऱ्या हिंसाचाराविरूध्द महिला कितपत आपल्या न्याय हक्कासाठी लढतात या संबंधी अध्ययन उपरोक्त समस्यांच्या माध्यमातून करण्याचा प्रयत्न आहे.

**अध्ययनाचे उद्दिष्ट्ये:**

१. भारतातील महिलांच्या स्थितीचे वर्णन करणे.

२. महिलांवर होणाऱ्या अत्याचारावर आळा घालण्यासाठी उपाय सुचविणे.

**गृहीतक:**

१. आधुनिक काळामध्ये महिलांच्या संरक्षणासाठी अनेक कायदे असले तरी त्यांच्या परिस्थितीमध्ये सुधारणा झालेली दिसून येत नाही.

**अध्ययनाचे महत्व:**

आज बघितल तर अस लक्षात येईल कि, भारतामध्ये महिलांसाठी संरक्षक कठोर कायदे असून सुध्दा त्यांच्यावर होणाऱ्या अत्याचारांच्या घटनेत फारसा बदल झालेला दिसत नाही. महिलांवर अत्याचार केवळ गुन्हेगार, गरिब आणि अशिक्षीत लोकच करत नाही, तर मोठया श्रीमंत व शिक्षीत लोकांमध्ये सुध्दा याचे प्रमाण खूप जास्त आहे. महिलांचे रक्षण करणे जगासमोरील सर्वात मोठे आव्हान आहे. याचे मुख्य कारण आहे असमान वागणूक किंवा व्यवस्था. लैंगिक असमानतेपासून पिडीत स्त्री, लहान मुलं, अपंग तसेच वंचित घटक यांचे हिताचे संरक्षण गरजेचे आहे. या समस्येचा प्रतिकार चिंता व्यक्त करून, घोषणापत्र जाहीर करून किंवा राजकीय संदेशाद्वारे केले जाऊ शकत नाही. तसेच कोणत्या करारावर सही करून ही समस्या दूर करणे शक्य नाही. भारतामध्ये लैंगिक असमानामुळे होणाऱ्या अत्याचाराचे मुख्य कारण म्हणजे गरिबी आणि अशिक्षा आहे. हे प्रमाण काही सुशिक्षित लोकांमध्ये सुद्धा बघायला मिळत आहे. यावर आळा घालण्यासाठी अनेक कठोर कायदे करून सुध्दा लोकांच्या उत्पीडनाच्या घटनांमध्ये रोजच वाढ होत आहे. यासाठी जबाबदार आहे ती शासन आणि प्रशासनाची उदासीन वृत्ती. त्यामुळे बाल विवाहाची प्रथा कायम आहे, हुंडाबळी वाढत आहेत, देवदासी सारख्या प्रथेद्वारे आज सुध्दा महिलांना वेष्या व्यवसायामध्ये ढकलले जाते. गरीब ग्रामीण कुटुंबातील मुलींना अनैतिक अवैध व्यापासाठी खरेदी विक्री केली जाते. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात लहान मुलं, महिला व विधवांसोबत भेदभाव केल्या जातो. बंधुआ मजूरी प्रथा विरोधी अधिनियम 1986 व बालमजूरी निषेध व नियमन अधिनियम १९७६ चा क्रियान्वयन होऊ शकला नाही. उपरोक्त संदर्भ लक्षात घेता समाजामध्ये लैंगिक असमानातेमुळे महिलावर व इतर घटकांवर होणाऱ्या अत्याचांवर आळा घालून ती समस्या दूर करणे काळाची गरज आहे. करिता या अध्ययन समस्येची निवड करण्यात आली.

**लैंगिक असमानतेची कारणे:**

लैंगिक असमानता किंवा भेदभाव हा महिलांच्या शोषणाचा प्रमुख कारण आहे. समाजामध्ये महिलांसोबत वाईट वर्तन किंवा महिलांन खालचा दर्जा देऊन त्यांना हीन वागणूक देणे याला लैंगिक असमानता हा पमुख्य कारण जबाबदार आहे. लैंगिक असमानतेची काही कारणे उपरोक्त प्रमाणे सांगता येईल.

अ) पुरुषप्रधान संस्कृतीचा प्रभाव.

ब) पारंपारिक रीतीरिवाजांचा समाजावर असलेला पगडा.

ड) कौटुंबिक आणि आर्थिकदृष्ट्या (बेरोजगारी) कमकुवत असलेली महिलांची स्थिती.

इ) महिलांमध्ये शिक्षण (अशिक्षित) आणि कायद्याच्या ज्ञानाचा असलेला अभाव.

ई) प्रसार माध्यमांद्वारे स्त्री संबंधित प्रसारित होणारे अश्लील चित्रफित.

फ) स्त्री संरक्षणासाठी कठोर कायद्याचा असलेला अभाव इ. कारणे स्त्री शोषणाला आणि महिलांमध्ये होणाऱ्या भेदभावाला कारणीभूत आहेत.

**आधुनिक काळात महिलांची स्थिती व काही घटना:**

भारतीय दंड संहितेनुसार बलात्कार, अपहरण, शारीरिक किंवा मानसिक अत्याचार, हुंड्यासाठी हत्या, पत्नीवर हल्ला, लैंगिक छळ, इत्यादी गंभीर गुन्हे म्हणून वर्गीकृत करण्यात आले आहेत. महिलांवरील हिंसाचाराशी संबंधित प्रकरणे सातत्याने वाढत आहेत आणि आता ती खूप वेगाने वाढत आहेत.

भारतातील महिलांवरील हिंसा ही एक जुनी सामाजिक समस्या आहे, ज्याची मुळे आता सामाजिक नियम आणि आर्थिक अवलंबनाच्या स्वरूपात स्थिरावली आहेत. रानटी सामूहिक बलात्कार, कार्यालयात लैंगिक छळ, ॲसिड फेकणे अशा घटनांच्या रूपात महिलांवरील हिंसा उघडकीस आली आहे. याचे ताजे उदाहरण म्हणजे 16 डिसेंबर 2012 रोजी राजधानी दिल्लीतील निर्भया सामूहिक बलात्कार प्रकरण.

23 वर्षीय मुलीवर झालेल्या सामूहिक बलात्काराने देश हादरला. परिणामी, बदलाची मागणी करत मोठा जमाव रस्त्यावर उतरला. अशा घटना रोज घडत असल्याने महिलांना सामाजिक नियम बदलणे अशक्य वाटते. लोकांची वाढती शैक्षणिक पातळी असूनही, ही समस्या भारतीय समाजासाठी गंभीर आणि गुंतागुंतीची बनली आहे. महिलांवरील हिंसाचारामागील मुख्य कारणे म्हणजे पुरुष प्रधान विचारसरणी, कमकुवत कायदे, राजकीय रचनेत पुरुषांचे वर्चस्व आणि अकार्यक्षम न्यायव्यवस्था. एका संशोधनानुसार, स्त्रिया त्यांच्या घरी सुरुवातीच्या काळात हिंसेला बळी पडतात. महिलांना त्यांच्या कुटुंबातील सदस्य, पुरुष नातेवाईक, शेजारी, विशेषत: ग्रामीण भागात त्रास दिला जातो.

या दिवसांमध्ये महिलांवरील अत्याचाराच्या घटनांमध्ये तेजी आली आहे. एकही दिवस असा जात नाही जेव्हा महिलांवर अत्याचाराच्या घटना देशाच्या कानाकोपऱ्यातून नोंदवल्या जात नाहीत. एकापाठोपाठ एक अत्याचार – क्रूरता आणि क्रूरतेच्या मर्यादा ओलांडणे. बलात्कार आणि विशेषत: सामूहिक बलात्काराच्या घटना आता सामान्य होत आहेत. यामध्ये सुद्धा वयाचा विचार न करता. जेव्हा सहा वर्ष, आठ वर्षे किंवा अकरा वर्षांच्या मुलींवर अमानुष बलात्काराच्या घटना घडतात, तेव्हा काय घडले हे आपल्या सर्वांना समजत नाही. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रामध्ये तिच्या सोबत भेदभाव होत आला आहे. महिलांसोबत वाईट व्यवहार आणि छेळछाळीसारखे कृत्य घरात, रस्त्यांवर, बगिच्यांमध्ये, कार्यालय सर्वच ठिकाणी बघायला मिळतात. पोलीस सुध्दा महिलांवर होणाऱ्या अत्याचाराला बघुन बेदखल करतात. बलात्कार, हुंडाबळी, खून इ. सारख्या गोष्टी समोर येतात. परंतु त्यापैकी जास्तीत जास्त गुन्हेगारांना माहितीच्या अभावी सोडून दिल्या जाते. बाल विवाह सारख्या समस्यांनी मुली आजही त्रस्त आहेत. महिलांचे अपहरण करूण त्यांना वेश्या बनविणे, जाळून मारणे तसेच त्यांना शारीरिक व मानसिक त्रास देणे सामान्य गोष्ट बनलेली आहे. महिला साक्षरता अभियान तसेच सशक्तिकरणाद्वारेच त्यांना मूलभूत अधिकार प्राप्त होऊ शकतात. "मध्य प्रदेशातील बेडिया जनजातीमध्ये मुलीचा जन्म आनंद घेऊन येतो कारण मुली वयात आल्या नंतर कुटूंबाच्या रोजी रोटीचे साधन बनतात. देह व्यापाराच्या धंद्यामध्ये परंपरेच्या नावाने आपल्या मुलीला स्वखुशीने ढकलल्या जाते."[1]

"स्वतःला मानवाधिकाराचे रक्षक समजणाऱ्या अमेरिकेची वास्तविकता अशी आहे की तेथे १४ वर्षापेक्षाही कमी वय असलेल्या मातांची संख्या लाखोच्या घरात आहे व अवैध आई-वडील नसलेल्या मुलांची संख्या करोडो मध्ये आहे."[2] जगाच्या पाठीवर महासत्ता असलेल्या देशामध्ये अशा प्रकारच्या घटना होत आहेत. आई-वडीलांच्या मारहाणीने मरणाऱ्या मुलांची संख्या हजारोवर आहे. शाळेमध्ये शिक्षण घेणाऱ्या लहान मुलांना सुध्दा आपल्या अस्तित्वासाठी शारीरिक श्रम करावे लागते. जगामधील असा कोणताच देश नसेल जिथे महिलांचे शोषण होत नाही. विकसनशील देशामध्ये याचे प्रमाण जास्त आहे.

"नॅशनल क्राइम ब्युरो रिपोर्ट, ब्युरो मिनिस्टर ऑफ होम अफेअर (२००१) च्या नुसार स्त्रियांना त्यांचा पती, सासु, सासरा, आई, वडील, भाऊ आणि नातेवाईकांव्दारे त्रास दिल्या जातो. १९९६ ते

२००१ पर्यत जेवढे गुन्हे स्त्रियाविरूध्द घडले त्यामध्ये पिडा जास्त आहेत. यामध्ये पिडा देणारे गुन्हे ३५२४६ होते तर २००१ पर्यत या गुन्हयामध्ये ४९१७० एवढी वाढ झाली."यावरून माहीती मिळते की स्त्रियावर होणारे गुन्हे हे दिवसेंदिवस वाढतच चाललेले आहे. ही एक समाजाला काळिमा फासणारी गोष्ट आहे. दिल्ली मधील इंस्टिट्युट ऑफ सोशिअल सायन्स २००१ च्या रिपोर्ट नुसार मुजफ्फर नगरातील चतुरभूज मधुन एक महिन्याला ४० मुलींची विक्री केली जाते, प्रत्येक मुलीला ४ हजारांमध्ये खरेदी करून त्यांचे वय व चेहरा बघुन १० ते २५ हजाराला विक्री केली जाते. याप्रमाणे दलाल या क्षेत्रामधून १० लाख रूपयांपेक्षाही जास्त कमाई मुलीच्या देहविक्रीवर करीत असतो.[3] अशा प्रकारच्या घटना आज पण घडताना दिसत आहेत.

१४ सप्टेंबर २०२० ची हाथरस घटना हि मन हेलावून टाकणारी घटना आहे. यामध्ये उत्तर प्रदेशातील हाथरस येथील ४ उच्च जातीच्या युवकांनी १९ वर्षीय एका दलित मुलीवर क्रूरपणे मारपीट आणि बलात्कार केल होत. १९ सप्टेंबर रोजी उपचारादरम्यान युवतीचा मृत्यू झाला. यावेळी प्रशासनाने कथित रित्या मध्यरात्री स्वमर्जीने त्या मुलीचा मृत्युदेहाचा अंतिम संस्कार केला. यावेळी त्या पिडीत मुलीच्या परिवाराला शेवटची भेट सुद्धा करता आली नाही. या घटनेमध्ये गुन्हा करणाऱ्या व्यक्तीच काय झाल हे कुणालाच माहित नाही. देशातील या घटनेवरून लक्षात येते कि आपली प्रशासन आणि पोलीस यंत्रणा किती सक्रीय आहे. प्रशासनाच्या या व्यवहारामुळे गुन्हेगाराला पुन्हा बळ मिळत आहे.

**महिलांची स्थिती सुधारण्याचे उपाय:**

महिलांची समाजातील स्थिती सुधारण्यासाठी कठोर कायद्या व्यतिरिक्त खूप काही गोष्टी करणे गरजेचे असते त्या संबंधी उपाय योजना उपरोक्त प्रमाणे सांगता येईल.

१. महिलांवर होणाऱ्या बलात्काराच्या शिक्षेसाठी फाशीसारख्या कठोर शिक्षेची तरतूद कायद्यात करणे.
२. पोलीस प्रशासनामध्ये अतिरिक्त महिला पोलीस दलाची स्थापना करणे.
३. महिलांना कायदेविषयक माहिती देऊन त्यांना कोणत्याही प्रकारची भीती न बाळगता गुन्हेगाराविरुद्ध आवाज उठविण्यासाठी हिम्मत देऊन विशेष संरक्षण प्रदान करणे.
४. महिलांप्रती होणाऱ्या हिंसेवर आळा घालण्यासाठी समाजामध्ये जनजागृती कार्यक्रम घेऊन समाजाच्या मानसिकतेत बदल घडविण्यासाठी प्रयत्न करणे.
५. समाज माध्यम किंवा प्रसार माध्यमाद्वारे प्रसारित होणाऱ्या अश्लील चित्रफितीवर बंदी घालणे आणि त्यावर कारवाई करणे.
६. समाजातील घटक रूढी-परंपरावर बंदी आणणे आणि अशा घटकावर कायदेशीर कारवाई करणे.
इ.

**संदर्भ सूची:**

[1] विप्लव, "मानवाधिकार के आईने में महिलाएँ", विस्ट इंटरनेशनल पब्लिशिंग हाउस, दिल्ली, २०११-पृ.२६५
[2] खंडेला मानचंद, "मानवाधिकार एवं सामाजिक न्याय", अविष्कार पब्लिशर्स, डिस्ट्रीब्यूटर्स, जयपूर (राजस्थान), २००८, पृ.-१८
[3] ममता, "घरेलू हिंसा अधिकारों के प्रति महिलाओंकी जागरूकता", रेगल पब्लिकेशन, नई दिल्ली, २०१०. पृ.क्र.-८१